ISSN-2320
RNI No.MAHAUL03008/13/201
UGC Approved

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

VOLUME : I SPECIAL ISSUE APRIL 2018



UGC Approved Sr.No.45681

ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE I EDUCATION
MANAGEMENT MEDICAL | ENGINEERING & IT I LAW | PHARMACY
PHYSICAL EDUCATION I SOCIAL SCIENCE | JOURNALISM

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

ADAT V... EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist. Nanded *

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An international Multilingual Quarterly Refereed Research Journal**

# UGC Approved Journal

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate

• Mailing Address •
Dr. Sadashiv H. Sarkate
Editor POWER OF KNOWLEDGE
**Head of Dept. Marathi**
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

Price : Rs. 300/-
Annual Subscription: Rs. 2000/-

# अनुक्रमणिका (INDEX)


| अ. क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | १९९० ते २०१५ या कालखंडातील स्त्री कथाकारांच्या कथांमधील स्त्रियांचे भावविश्व | प्रा.डॉ.संगिता शेळके | ६ |
| २ | महाराष्ट्रातील एक धार्मिक सांस्कृतिक परंपरा असणारी समानतेची वारी | प्रा.डॉ.रामकृष्ण ज्योतिबा प्रधान | ९ |
| ३ | समकालीन ग्रामीण कवितेतील सामाजिक स्थित्यंतरं | प्रा.डॉ.रमेश श्रीरंग ओलाडे | १२ |
| ४ | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | प्रा.डॉ. टापरे अंजली दत्तात्रय सोण्णीवाल | १५ |
| ५ | वर्तमानातील लोकसाहित्य | डॉ.बी.आर. दहिफळे | १८ |
| ६ | आंबेडकरवादी कविता | प्रा.डोंगरे मनिषा सदाशिव | २३ |
| ७ | मर्ढेकरांची गणपत वाणी कविता - एक आकलन | प्रा.गीता जाधव | २७ |
| ८ | वेगळेपणात वेगळी | डॉ. सविता खोकले | ३१ |
| ९ | मुस्लीम मराठी लोकसाहित्य एक शोध | प्रा. युवराज देवबा भामरे | ३४ |
| १० | सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य | प्रा.डॉ.शिवाजी लक्ष्मण नागरगोजे | ३७ |
| ११ | भारतीय समाजातील स्त्रीयांची भूमिका | प्रा.डॉ. आर.बी. लक्षटे | ३८ |
| १२ | भारत संविधान आणि मानव अधिकार | सिध्दार्थ मुंगे | ४२ |
| १३ | स्वातंत्र्यपूर्व काळातील मुस्लिम धर्मातील सामाजिक सुधारणाचे विश्लेषण | प्रा.डॉ. आर.बी. लक्षटे | ४६ |
| १४ | औरंगाबाद जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेला पालकांचा प्रतिसाद एक चिकित्सक अभ्यास | प्रा.कु.सोनार सुजाता विक्रम | ५० |
| १५ | नवजात बालकाची मसाज करणे चांगली प्रथा-एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ.वाय.एस.चव्हाण<br>डॉ.सी.एस.वाय.चव्हाण<br>डॉ.सुयश वाय. चव्हाण<br>प्रा.भिमराव डी.पुंडगे | ५४ |
| १६ | २१ व्या शतकातील ग्रामीण समुदायील स्त्रीचे अरोग्य सामाजशास्त्रीय अभ्यास औरंगाबाद | श्री नंदलाल भिमराव बडे | ५७ |
| १७ | महिला बचत गटांची पार्श्वभूमी | प्रा. निर्मला पवार<br>डॉ. के. व्ही. पाटील | ६० |
| १८ | EMPLOYEE SAFETY MEASURES FOR BETTER WORKING CONDITION | Wilson Kandre | ६३ |

SADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# भारतीय समाजातील स्त्रीयांची भूमिका

प्रा.डॉ. आर.बी.
राज्यशास्त्र विभा
देगलूर महाविद्याल

झी मराठी या दुरचित्रवाहिनीवर दररोज सायंकाळी 8.00 वाजता "माझ्या नवऱ्यांची बायको" या शिर्षका मालिका दाखवली जाते. या मालिकेत राधिका आणि गुरुनाथ नावाचे बायको आणि नवरा असे नातेसंबंधी असण प्रमुख पात्र आहेत. यातील गुरुनाथ हे पात्र शनया सबनिस नावाच्याआपल्यच ऑफिसमधील मुलीच्या प्रेमात वेडा तर राधिका ही एक सरळ साधी,सुशिल, प्रेमळ, गृहिणी आहे.तिचा आपला नवरा (गुरुनाथ), मुलगा (अथर्व) व अ कुटूंब व संसारावर खुप प्रेम असतो. परंतु गुरुनाथ असा सोज्वळ पत्नीला घराबाहेर काढून त्याच्या पेश्यावर प्रेम क शनयाला घरी आणतो. तिला परदेशात फिरायला नेतो. तिच्यासाठी तो सर्वकाही करायला तयार असतो. पण ल लग्नाच्या बायकोचा मात्र तो तिरस्कार करत असतो. या मालिकेतील हे दृश्य या लेखा मागील प्रेरणा आहे.

मालिकेतील नाटकी स्वरुपातील एक दृश्य पाहुन मी व्यथित झालो. माझे मन विचार करु लागले की, प्रत्य देशातील स्त्री मग ती आई, बहीण, पत्नी, मावशी, मैत्रीण या कोणत्याही रुपातील असो ती कशी जगत असेल ? या स तिची भूमिका काय असेल ? या देशाच्या, समाजकारण, राजकारण व अर्थकारणात ती कोणता रोल निभावत अ तिच्या विषयी कुटूंब, समाज, राजकारणातील अभिजन व आम आदमी काय विचार करतो ? खरंच तिला समाज, शासन व प्रशासनाने संविधानातील सर्वच अधिकार देवून तिच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याचा होतो का ? या सर्व प्रश्नांवर या लेखातून दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न केला.

मालिकेतील प्रत्येक दृश्य हे एक नाटक असते याची मला माहिती आहे. पण मालिका समाजाचा अ असतात. समाजातील घडणाऱ्या घटनांचा वेध मालिकात घेतला जातो. हे मात्र नक्की व सत्य असते. त्यामुळेच मालि प्रबोधनाचे एक साधन मानले जाते.

या लेखात प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक स्त्रियांची स्थिती, तिच्याबाबतचे मानसशास्त्र समजून घेण्याचा केला. प्रस्तुत लेखाची माडणी करताना ऐतिहासिक व ग्रंथालयीन अभ्यास पध्दतीचा आधार घेण्यात आला. या ले वाचनाने वाचकांना भारतीय समाजातील स्त्रियाचे स्थान व भुमिका स्पष्टपणे समजेल. स्त्री भारतीय समाजाचा एक आधारशीला आहे. परंतु या मजबुत आधाराला संपवण्याचे काम अनेक घटक करत असतात या गृहितकास प्रमाण विवेचन करण्यात आले.

स्त्रियांचा सन्मान व तिच्या हिताचे संरक्षण करणे आमच्या देशाची प्राचीन संस्कृती आहे. परंतु भारतीय स स्त्रियांची स्थिती खेदजनक व खालावलेली आहे. भारतीय समाजात स्त्रिला अबला-सबला अशा विरोधी विशेषणाने स जाते. या परस्परविरोधी विशेषाने स्त्रीयांच्या विकासात अडथळे निर्माण केले. प्राचीन काळपासूनच स्त्रीकडे मा दृष्टिकोनातुन पाहत नसत. पुरुषांच्या समान स्थान व अधिकारी मागणी ती अनेक वर्षापासून करते. भारतीय स स्त्रीला मानाचे, सन्मानाचे स्थान नसले तरी या समाजाच्या जडणघडणीत स्त्रीची भुमिका अत्यंत महत्वपुर्ण आहे. समाजाला टिकवून ठेवण्यात स्त्रीचा वाटा महत्वाचा आहे. भारतीय स्त्रीने वेगवेगळया स्वरुपात आपली भुमिका नि उदा: सीता, काली, लक्ष्मी, सरस्वती ई. तरी ती अनेक वर्षापासून समाजाच्या अत्याचार व शोषणाची बळी ठर तिच्या हिताचे संरक्षण करुन समताधिष्ठित समाजाची स्थापना करुन तिला न्याय मिळवून दयावा यासाठी राज्यघटनं

VYAPARI EDUCATION SOCIETY'S ... COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

तरतुदी करण्यात आल्या. उदा. आरक्षण, पुरुषासमान मुलभूत अधिकार इ. 8 मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिवस साजरा केला जातो. स्थानिक स्वराज्य संस्थात 50% आरक्षण दिले तर लोकसभा व विधानसभातही कधी 33% तर कधी 50% आरक्षणाची मागणी केली जाते. तरी तिच्यावरच्या अत्याचार व शोषण थांबत नाही. ती हिंसा व क्ररतेची बळी आहे. वर्तमानातील भारतीय स्त्री सुरक्षित आहे. प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहे. तिला सामाजिक, आर्थिक व सामाजिक न्याय मिळवुन देणे गरजेचे आहे. तरच समाजाचा सर्वांगीण विकास होईल.

भारतीय स्त्री स्वातंत्र्यानंतरही पारतंत्र्यातच जीवन जगत आहे. तीला आजही सन्मानाचे स्थान मिळाले नाही. हुंडा पध्दतीच्या बळी अनेक महिला जात आहेत. तसेच कांही महिला पुरुषी अत्याचाराच्या बळी ठरतात. अशा परिस्थितीत भारतीय महिला शिक्षण, आधुनिकीकरणाच्या स्पर्शाने प्रेरीत होवुन भारतीय सभ्यता व संस्कृतीचे संरक्षण करण्यासोबतच या समाजाला दिशा देण्यात पुरुषांच्या बरोबरीने नव्हे त्यापेक्षा एक पाऊल पुढे टाकून काम करत आहे. भारतीय स्त्री अराजकतेच्या वातावरणात जगत असते. या देशात प्रत्येक रुपात तिचे शोषणच होते. वैदिक काळात आपल्या विद्वत्तेमुळे सन्मान मिळवणारी महिला मोगलकाळात गुलाम बनते. राजाच्या राणीगृहाची शोभा बनते. अशाही परिस्थितीत तीने संघर्ष केला. या संघर्षाने तिच्या अवतोभोवतीचे सर्व बंधने गळुन पडली. त्यांची योग्यता व समतावर पुरुषप्रधान समाजाला बंधने टाकता आली नाहीत.

स्वातंत्र्य चळवळीत स्त्रीने सक्रिय सहभाग नोंदवला. राज्यघटनेतुन समान दर्जा मिळवला. भारतीय स्त्रीला राज्यघटनेतील अधिकाराचा वापर करुन स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करता यावा म्हणुन अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. असेच प्रयत्न स्वातंत्र्याअगोदर प्राचीनकाळापासुन मध्ययुगीनकाळ व आधुनिककाळापर्यंतही करण्यात आले. तरीही स्त्रीच्या सामाजिक स्थितीत बदल झाला नाही. पुरुषप्रधान समाजात स्त्री दुहेरी भूमिका निभावते. तरी पुरुषप्रधान समाज तिला समान दर्जा देत नाही. पुरुषाच्या या विचाराला वर्तमानातील संघर्षप्रवण स्त्री विरोध करते. स्त्रियांच्या या संघर्षशील विचारांना दडपण्यासाठी समाज सीता, गांधारी, सावित्री यांची कथा व उदाहरणे स्त्रीयांना सांगतो. परंतु वर्तमान परिस्थितीत सीता, गांधी, सावित्रीच्या पात्रांना जशास तसे रेखाटणे अशक्य आहे. कारण वर्तमान परिस्थिती आणि आवश्यकतात फार बदल झाला. त्यामुळे वर्तमान भारतीय स्त्रीला सीता, गांधारी व सावित्री बनणे कठीण आहे. तर आजचे पुरुषही राम, धृतराष्ट्र नाहीत. तरी भारतीय स्त्री पतीसोबतच जन्मा जन्माचे नाते निभावण्यास तयार असते. स्त्री भारतीय संस्कृतीची वाहक व निर्माती आहे. तिला रामायणाच्या काळात अग्निपरीक्षा दयावी लागली. आजही तिला शिक्षण घेणे, चांगली नोकरी मिळवणे ती टिकवणे, कार्यालयातील राजकारण व पुरुषप्रधान नजरा व संस्कृतीचा सामना करणे, तसेच यासोबत कुटुंबातील मुले, सासु-सासरे, नवरा या सर्वांची जबाबदारी सांभाळणे हे देखील दिव्य अग्नी परिक्षाच आहे. आजही स्त्री स्वतःची ओळख निर्माण करत आहे. ती सीतेप्रमाणेच दृढनिश्चयी, पतीला सहकार्य करणारी, कर्तव्यनिष्ठ स्त्री आहे. परंतु आजच्या स्त्रीच्या कार्यकक्षा रुंदावत आहेत.

पारंपारिक असो की आधुनिक जगातील सर्व सभ्यता, स्त्रीयासाठी हानीकारक सिध्द होत आहेत. यत्र नार्यस्तु पुज्यन्ते स्त्रीबाबतचा हा विचार तिला तिच्या व्यक्तीमत्व विकासापासून दुर खेचत आहे. तरीही स्त्री अशाच परिस्थितीत स्वतःचा आत्मा जागरुक व प्रगत करुन स्वतःचे व्यक्तिमत्व विकसित करते. स्वातंत्र्य चळवळीला महात्मा गांधीनी विशिष्ट लोकांच्या हातातुन आम लोकांच्या हातात दिले. तेव्हा त्यात त्यांनी स्त्रियांच्या सहभागाला जाणीवपूर्वक स्थान दिले. परदेशी वस्तुवरील बहिष्कार, सविनय कायदेभंग, सत्याग्रहाच्या सर्व कार्यक्रमात स्त्रियांच्या सक्रिय सहभागीत्वाने त्यांच्या सामाजिक व राजकीय दृष्टिला स्पष्ट केले. परिणामतः स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय नेतृत्वाला संधी मिळाली. तसेच स्वातंत्र्य चळवळीला सामाजिक सांस्कृतीक आव्हानाशी जोडण्यात आले. वर्तमान आधुनिक भारतीय समाजात व परिस्थिती फार बदल झाला. प्राचीन व मध्यकाळापासुन भारतीय स्त्रीने समाजाला सुदृढ बनवले. तरी तिचे शोषण, अत्याचारापासुन

मुक्तता झाली नाही. आज स्त्री सन्मान, स्त्री जागृती, स्त्री सवलत, स्त्री सबलीकरणाची चर्चा सर्वत्र होत आहे. राजकीय नेत्यापासून प्रशासकीय अधिकारी, समाजसुधारक, सामाजिक चळवळीचे नेते, प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी समान अधिकार, महिला सबलीकरण, इत्यादी विषयावर भाषणे देतात.

परंतु वास्तवतेत या पुरुष प्रधान समाजाचा दृष्टिकोन स्त्री बाबतचा वेगळाच असतो. आमच्या देश पंतप्रधान , राष्ट्रपती, लोकसभेची सभापती बनली, तिने अंतराळात प्रगती केली, माऊंट एव्हरेस्टर यशस्वी चढाई के पुरुष आणि स्त्री यांच्यातील चित्र विरोधाभासाचे आहे. भारताच्या सामाजिक इतिहासाचा आधार होता हे स्पष्ट ह बाठिकाणी नेहमीच स्त्रीची उपेक्षा केली. आजपर्यंत स्त्रीसोबत समता, न्याय व मानवतेचे वर्तन होत नाही. भारतीय राज्य सर्वांना सामाजिक, राजकीय व आर्थिक न्याय असतील असे नमुद केले. तसेच प्रत्येक भारतीय नागरीकाला, स्वातंत्र्य संधीची समता असेल. त्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिका, मुलभूत अधिकार,मार्गदर्शक तत्त्व आणि इतर त महिला, अल्पसंख्यांक आणि समाजाच्या मागास वर्गाला, विकास करण्याची समान संधी दिली. या संधीमुळे त्या देशाच्या मुख्य प्रवाहाशी जोडता येईल. भारताला मजबुत, सक्षम,, प्रगतशील बनवण्यासाठी महिला, मुली, बाल सुरक्षा, संरक्षण व प्रगतीसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली. जेणेकरुन त्यांचे मागासलेपण संपेल. राजकीय क्षेत्रा व्यक्ति एक मतदानाच्या तत्वाचा स्विकार करण्यात आला. यामुळे प्रत्येक व्यक्तीस मग तो कोणत्याही जाती, धर्म, स लिंगाचा असो त्या सर्वांना समान संधी मिळाली. लोकशाहीत शासनात बदल करण्यात स्त्रियांनी पुरुषांच्या बरोब सहभाग नोंदवला भारतात महिलांना मतदान करुन शासनात सहभागी होण्याचा अधिकार अनेक विकसित देशांच्या तु प्रारंभापासूनच मिळाला. पण त्याची पुर्तता होताना दिसत नाही. सामाजिक क्षेत्रात महिलांना राज्यघटनेने समान अ दिले. परंतु व्यवहारात त्याचे पालन होत नाही. त्यामुळेच तिच्या विरुध्दच्या अत्याचार व गुन्हयात वाढ होते. जो काळ विषय आहे. या काळजीच्या विषयाला कायमचे नष्ट करण्यासाठी राज्यघटनेने कलम 14 नुसार सर्वांना कायदयापुढे स मानले. कलम 15 नुसार लिंगाच्या आधारावर होणाऱ्या भेदभावास विरोध करण्यात आला.

अज्ञानी असली तरी तीचे वर्तन सुशिक्षिता सारखेच सामंजस व संयमाचे असते. ती स्वावलंबी बनण्याचा प्र करते. आपल्या अधिकार व कर्तव्याप्रती जागरुक आहे. स्त्रीच्या शिक्षणामुळे काम करणाऱ्या महिलात वाढ झाली. कुटूंबाप अनेक क्षेत्रात ती आपली सेवा निःशुल्क देते. तिला हिच्या सेवेप्रमाणे मुल्य मिळत नाही. ती कार्यालयात नोकरी स असली तरी कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे जबाबदारीने निर्वाहन करते तरी त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

कालमानाप्रमाणे स्त्रियांची शोषण वाढत आहे. तर तिच्या प्रगतीत ही वाढ होत आहे. आजची स्त्री देवी बनण्या एक मनुष्य बनु इच्छिते. वर्तमानातील जागरुक महिलांच्या व्यक्तिमत्वातून अनेक सद्‌गुण अभिव्यक्त होतात. आज स्त्रीला अनेक अग्निपरीक्षातून जावे लागते. आरक्षणाने समाज व राष्ट्राचे लक्ष स्त्रियांच्या प्रगतीकडे वेधले. जेणेक महिलांच्या स्थितीत काही प्रमाणात बदल झाला. काही प्रमाणात महिलांच्या समस्याबाबत अनेक घटकाकडून लिखाण झ महिलांच्या स्थिती व समस्याबाबत चिंतन करणाऱ्या अनेक परिषदांचे आयोजन करण्यात आले. महिलांना मार्गात येणा अडचणी व समस्यांना नष्ट करण्याबाबत विचार करावा या समस्यांना नष्ट करण्यासाठी निर्माण केलेली साधने महिलांस पोहचवल्याने ही समस्या सुटणार नाही. यासाठी स्त्री, स्त्रीच्या समस्या,स्त्रीवरील अन्याय याबाबत लोकांच्या विचा मानसिकतेत व्यापक बदल करण्याची गरज आहे. विशेषतः पुरुष व पुरुषी मानसिकतेत व्यापक बदल करण्याची आवश्य आहे. याबाबत लोकांचा व्यापक सहभाग आवश्यक आहे. लोकांत जाणीव जागृती निर्माण करावी लागेल. पुरुषांनी आप काही अधिकारांचा त्याग करुन ते स्त्रीयांना दयावेत. ज्यामुळे महिलांना काही फायदा होईल. यात बिगर शासकीय संघट प्रसार माध्यमांनी महत्वाची भुमिका वजावावी. याशिवाय लैंगिकतेच्या आधारावरील विषमता हेच महिलाप्रती दुय्यम भावना वाढवण्याचे मुख्य कारण आहे. भारतीय समाजात आजही मुलांनाच प्राथमिकता दिली जाते. मुलांनाच वारसा

दुय्यम समजले जाते. मुलाच्या तुलनेत मुलींना दुय्यम वागणूक दिली जाते. यासाठी आपणास अनेक धार्मिक व सामाजिक रूढी-परंपरांना बदलावे लागेल. पुरुषापेक्षा महिलांना कमी लेखणाऱ्या धर्मग्रंथ, संस्काराविषयी व उत्सवांनाही नाकारावे लागेल. बालपणापासूनच मुलींकडून गृहस्थीच्या कामासाठी होणारी सक्ती व बंधने नष्ट करावी लागतील. मुलेच कुटूंबाचा उदरनिर्वाह करू शकतात या समाजाच्या मानसिकतेला बदलावे लागेल. या मानसिकतेमुळे मुली कुटुंबाचे उदरनिर्वाहासाठी आवश्यक कला, गुण व कौशल्य मिळवण्यात कमी पडतात. कारण त्या त्यासाठी आवश्यक कौशल्य मिळवण्यासाठी पूर्णपणे सक्षम नसतात. यामुळे रोजगार प्राप्तीच्या ठिकाणी त्यांचे शोषण होते. हुंडा पध्दती, मुलीच्या जन्मावर दुःख व्यक्त करणे, मुलाच्या जन्माचा आनंद साजरा करणे, पुरुषानांच धार्मिक कृत्य करण्याचा अधिकार असणे, पडदा पध्दती, गर्भावस्थेत होणारे लिंग परीक्षण, स्त्री भ्रुण हत्या, सातच्या आत घरात हे बंधन मुलींसाठी, पुरुषासाठी मात्र कोणतेही बंधन नसणे इत्यादी सामाजिक रूढी व परंपरा समाजात आजही आहेत.

रोजगार, संपत्ती, इ. क्षेत्रातही महिलांना विषमतेची वागणूक मिळते. वडिलोपार्जित संपत्तीचा वारसदार पुरुषच असतो. रोजगाराच्या क्षेत्रात महिलांना समान संधी देऊन भेदभाव संपवण्याबाबतची चर्चा होते. महिलांच्या हितासाठी कायदा करून शासनाने त्यांच्या विकासासाठी अनेक योजना बनवण्याच्या दिशेने प्रयत्न केले. परंतु या विषयाचे सामाजिक चळवळीत रूपांतरण करणे आवश्यक आहे. शासन अनेक बाबतीत जागरूकता निर्माण करू शकते. परंतु यासाठी लोकांनी स्वतःहून पुढाकार घेणे क्रमप्राप्त आहे.

परंतु याबाबत म्हणावा तेवढा लोकउत्साह, लोकसहभाग सातत्याने पाहावयास मिळत नाही. महिला, मुली, बालिका यांचा बलात्कार, सामुहिक बलात्कार झाला तेव्हा मात्र मोठ-मोठ्या शहरातून कँडल मार्च काढून आपला राग व्यक्त करतात. परंतु हा राग किंवा शासन व समाजाविरोधी अभिनिवेष सतत राहत नाही. काही क्षणात, दिवसात तो नष्ट होतो. तदनंतर काही विशिष्ट दिवसांच निमित्ताने चर्चा होते. भारतात महिलांच्या स्थितीत सुधारणा होण्यासाठी 12 व्या शतकात दक्षिण भारतात महात्मा बसवेश्वरांनी जे सामाजिक आंदोलन केले, तश्याप्रकारचे आंदोलन आज होत नाहीत. आजच्या आंदोलनाला तडजोडीच्या व राजकीय स्वरूपाने संपवले. शासन जनतेला महिला सबलीकरणाच्या कार्यक्रमाकडे आकर्षित करून यात यश मिळवण्यात अपयशी ठरले. शासनाच्या धोरणाकडून महिलांची सामाजिक, राजकीय व आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टिने सकारात्मक प्रयत्न होत नाहीत. त्यामुळे महिलांची क्षमता, योग्यता असूनही त्यांच्या विकास होत नाही. तो व्हावा म्हणून समाजाने या विषयाकडे निष्ठेने, उत्साहाने व आपल्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असणारा विषय आहे. म्हणून पहावे तरच महिलांची समाज बांधणीत आणखीन योगदान देण्याची भावना विकसित व सुदृढ होईल.

संदर्भ :


1)पंचायत राज आणि महिला नेतृत्व - डॉ. अजय पाटील - मैत्री प्रकाश - लातूर 2011

2)मानवाधिकार एवं महिलाएं - प्रकाश नारायण नाटाणी - सबलाइव पब्लिकेशनस - जयपूर-2005

3)पंचायतीराज एवं महिला सशक्तीकरण - अनिता मोदी-युथ जयपूर-2009

4)स्त्री भ्रुण हत्या एक सामाजिक समस्या- संपादक- डॉ. कल्पना डोंबे, प्रा. संगीता धुगे-मिस्बाह प्रकाशन नांदेड-2012

5)Women Empowerment - Editor - Prof. Pandurang Muthe- Aruna Prakashan Latur-2016

6)महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख-डा. वैशाली पवार

7)भारतीं समाजरचना पारंपारिक व आधुनिक - डॉ. प्रकाश बोबडे-श्री मंगेश प्रकाशन नागपूर 2010

8)समाजशास्त्र भा.कि. खडसे-हिमालया बुक्स प्रा.लि. - मुंबई-2008

9)महिलांचे सबलीकरण आणि शेतकरी महिला आघाडीचे योगदान- डॉ. सौ. नंदिनी तडकलकर(बोमरे) अल्फा पब्लिकेशनस, नांदेड. 2008




Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded.